महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे : ४११ ००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२६०३ Email ID : dirtpvd.pune@maharashtra.gov.in

महत्वाचे/ लगोलग कार्यवाही

जा.क्र.:सं.नि.क./EoDB-Integration/NOC/४४९ दि ३०/०१/२०२६

**प्रति,**

१) **मा. महापालिका आयुक्त,**
(**सर्व**) महानगरपालिका.

२) **मा. महानगर आयुक्त/ मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**(सर्व) विशेष नियोजन/ विकास प्राधिकरणे**

**विषय :-** पोटहिस्सा मोजणी कार्यवाहीसाठी तात्पुरते रेखांकन मंजूरी प्रक्रियेची अंमलबजावणी करण्याबाबत

**संदर्भ :-** मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.भू-२/ ई ऑ क्र.७९७५८९/२०२५, दि. २२/०१/२०२६.(छायाप्रत संलग्न)

महोदय,

उपरोक्त विषयांकित बाबीस अनुसरुन, संदर्भिय पत्रान्वये मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्रातील बाबींचे कृपया अवलोकन व्हावे. त्यामध्ये नमूदप्रमाणे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. २.६१ मधील तरतुदींनुसार कोणत्याही जमिनीची उपविभागणी करताना किंवा भूखंडांचे अभिन्यास करताना, प्रथम टप्प्यात तात्पुरत्या अभिन्यासास सिमांकनाकामी शिफारस करणे संदर्भाने निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्याचा विचार करता, संदर्भिय पत्रामध्ये नमूद केलेप्रमाणेच्या तसेच उक्त नमूद नियमावलीमधील सर्व संबंधित तरतुदींना अधिन राहून बहुतांश विकास/ बांधकाम परवानगी प्रकरणांमध्ये प्रथमतः तात्पुरत्या अभिन्यासास सिमांकनाकामी शिफारस करणेसंदर्भाने निर्णय घेणे अभिप्रेत व आवश्यक असताना, काही नियोजन/ विशेष नियोजन प्राधिकरणांकडून या अनुषंगानेची कार्यवाही होत नसल्याची वस्तूस्थिती निदर्शनास येत आहे.

बहुतांश विकास/ बांधकाम परवानगी प्रकरणी जमिनीची उपविभागणी होत असल्याने, अशा नियोजित विकास/ बांधकाम परवानगी प्रकरणी, तात्पुरत्या अभिन्यासास सिमांकनाकामी शिफारस

करणेसंदर्भाने निर्णय घेऊन, अशा तात्पुरत्या शिफारशीचे अभिन्यास नकाशे, सिमांकनाच्या मोजणीकामी भूमि अभिलेख विभागाकडील संबंधित कार्यालयांना विहीतरित्या पाठविणे व भूमि अभिलेख विभागाच्या संबंधित कार्यालयांकडून सिमांकनाची मोजणी होऊन प्राप्त होणाऱ्या मोजणी नकाशांधारे अशा विकास/ बांधकाम परवानगी प्रकरणी अंतिम अभिन्यासाच्या मंजूरी संदर्भाने निर्णय घेण्याची कार्यवाही सर्व संबंधित प्राधिकरणांकडून करणे आवश्यक आहे.

उक्त बाबींसंदर्भाने सर्व संबंधित नियोजन प्राधिकरणाचे प्रमुख यांनी लक्ष द्यावे, ही विनंती.

सोबतः- वरीलप्रमाणे

आपला,

Digitally signed by
JITENDRA LAXMANRAO BHOPLE
Date: 30-01-2026 18:35:10

**(जितेंद्र ल. भोपळे)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादरः -

१) मा. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तवः -

सहसंचालक, नगर रचना, पुणे/ कोकण/ नाशिक/ अमरावती/ छ.संभाजीनगर/ नागपूर विभागीय कार्यालये.

/- आपल्या विभागातील सर्व संबंधित महानगरपालिका/ विशेष नियोजन/ विकास प्राधिकरणे/ शाखा कार्यालये यांना उक्त बाबींसंदर्भाने अवगत करावे.